CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# संक्षिप्त...

## शास्त्री विद्यालयात आशा भोसले यांना वाहिली भावपूर्ण श्रद्धांजली

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर दि. १७ एप्रिल : लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात स्वरसम्राज्ञी आशा भोसले यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.**

**याप्रसंगी अनिता यलमटे यांनी आशाताईंचा जीवनपट थोडक्यात सांगितला. भारतीय संगीत सृष्टीला सुरेल आवाजाने सात दशकाहून अधिक काळ मंत्रमुग्ध करणाऱ्या स्वरसम्राज्ञी आशा भोसले यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने सुरांचा एक अखंड प्रवास थांबला आहे. त्यांनी २० हून अधिक भाषात हजारो गाणी गाऊन कोट्यावधी रसिकांच्या मनावर राज्य केले.त्यांच्या गाण्यातून त्या नेहमीच स्मरणात राहतील.अशी भावना व्यक्त केली.**

**याप्रसंगी शास्त्री विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व वासंतीक वर्गातील विद्यार्थ्यांनी आशाताईंना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.**

## माउंट लिटरा झी स्कूलचे घवघवीत यश



**तभा वृत्तसेवा**

**उदगीर दि. १७ एप्रिल : येथील माउंट लिटरा झी स्कूलने १० वी CBSE बोर्डाच्या परीक्षेत १०० टक्के निकालाची नोंद करत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. एकूण ३४ विद्यार्थ्यांनी परीक्षेत सहभाग घेतला होता.**

**निकालानुसार, १० विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवले असून, ७ विद्यार्थ्यांनी ८० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवले आहेत. तसेच, ८ विद्यार्थ्यांनी ७० टक्क्यांपेक्षा अधिक, ८ विद्यार्थ्यांनी ६० टक्क्यांपेक्षा अधिक, तर १ विद्यार्थ्याने ५० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त केले आहेत.**

**विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाळेचे विश्र्वस्त सदस्य, प्राचार्य, RSD मॅडम, शिक्षकवर्ग आणि पालक यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले आहे. सर्व स्तरांवरून विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात येत आहे.**

**या यशामुळे शाळेचा शैक्षणिक दर्जा अधिक उंचावला असून, भविष्यातही अशीच उत्कृष्ट कामगिरी कायम ठेवण्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.**

## अनसरवाडा येथे आंबेडकर जयंती उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा दि. १७ एप्रिल :** तालुक्यातील अनसरवाडा येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त डॉ. अनिल कुमार गायकवाड सामाजिक सेवाकुंडच्या वतीने सर्वरोग निदान शिबिर व रक्तदान शिबिर व चष्मे वाटप मोठ्या उत्साहात व यशस्वीरीत्या पार पडले.

ग्रामीण भागातील नागरिकांना मोफत व दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित या शिबिराला परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या शिबिरामध्ये विविध आजारांचे तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करण्यात आली या यावेळी हृदयरोग तज्ञ डॉ.श्रीधर अहंकारी डॉ. एस एस शिंदे डॉक्टर मनमत गताटे डॉ. वारद डॉ.पांचाळ इत्यादी डॉक्टरांनी सहभाग नोंदवलात सेच आवश्यक त्या रुग्णांना मोफत औषधांचे वाटप करण्यात आले. रक्तदान शिबिरात युवकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवत सामाजिक बांधिलकीचे उत्कृष्ट उदाहरण घालून दिले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अजित माने, नूतन पंचायत समिती सदस्य अभिजीत उसनाळे , भाजप नेते नयन माने सरपंच किशोर वाघमारे यांची उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतुक करत अशा सामाजिक उपक्रमांची गरज अधोरेखित केली.

## मातृभूमी विद्या संकुलात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १७ एप्रिल : येथील मातृभूमी महाविद्यालय, मातृभूमी नर्सिंग स्कूल आणि कस्तुराबाई नर्सिंग स्कूलच्या वतीने भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी संस्थेच्या सचिव प्रा. उषा भीमराव कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना प्रा. उषा कुलकर्णी म्हणाल्या की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ संविधानाचे निर्माते नसून ते खऱ्या अर्थाने भारतीय महिलांचे भाग्यविधाते आहेत. त्यांनी महिलांना कायद्याने समान हक्क आणि न्याय मिळवून देण्यासाठी मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या विचारांवर चालणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

या जयंती उत्सवा निमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी डॉ. आंबेडकरांच्या जीवनकार्यावर आणि सामाजिक न्यायावर आधारित विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाला तिन्ही महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिस्तबद्ध वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्याची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन प्रा बिभीषण मद्देवाड यांच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.रणजीत मोरे ,प्रा.उस्ताद सय्यद, प्रा.शिवांगी वट्टमवार ,प्रा.अन्वेष हिपळगावकर, प्रा.दीक्षा स्वामी, प्रा.राहुल जाधव ,प्रा.प्रतीक्षा काकडे, प्रा.नेहा वाघमारे ,प्रा.मीरा पाटील ,प्रा.जगदीशा ओंकारे, प्रा.अश्विनी काळे ,प्रा.दयानंद टाके प्रा.विवेक देवर्षी ,प्रा.मयूर मुळे, पटेल मुबारक व अर्चना बिरादार या सर्वांनी परिश्रम घेतले.

# नगरपरिषदे द्वारे विविध विकास कामांचे लोकार्पणासह घरकुल लाभार्थ्यांना धनादेश वितरण



**तभा वृत्तसेवा**

**उदगीर दि. १७ एप्रिल :** उदगीर नगरपरिषदे द्वारे दि. १३ एप्रिल २०२६ रोजी निडेबन वेस येथे आपल्या गौरवशाली इतिहासाची साक्ष देणाऱ्या अशोकस्तंभाचे लोकार्पण व कोनशिलेचे अनावरण उत्साहात संपन्न झाले. याच कार्यक्रमात रमाई आवास योजना व प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुल पूर्ण केलेल्या लाभार्थ्यांचा गृहप्रवेश आणि प्रातिनिधिक स्वरुपात धनादेश आणि घरकुलाच्या चावीचे वितरण करण्यात आले.

नियोजन व विकास समिती शहाजी पाटिल, सभापती पाणीपुरवठा सय्यद रेश्मा खतिजा इमरोज, सभापती महिला व बालकल्याण समिती सय्यद खुर्शीदबी हनीफसाब, गटनेते मंजूरखा पठाण, गटनेते अनिल मुदाळे, गटनेते मनोज पुदाले, नगरसेवक व्यंकट बोईनवाड, धिरज कसबे, जवाहरलाल कांबळे, सचिन हुडे, शिवकुमार कांबळे, डॉ. बालाजी बिरादार यांच्यासह नगरसेविका भारती भोसले, निकिता अंबरखाने, मनकर्णा मुदाळे, गोकर्णा गायकवाड, शिल्पा उपरबावडे आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच सुधीर भोसले, नरसिंग शिंदे, डॉ. चंद्रकांत कोठारे, शशिकांत बनसोडे, मुकरम जागीरदार, कल्याण कपाळे, ओमकार गांजुरे, इमरोज सय्यद, शेख इस्माईल यांच्यासह नागरिक व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

गटनेते अनिल मुदाळे यांनी आमदार संजय बनसोडे यांच्या मार्गदर्शनामुळे अशोकस्तंभ उभारणी शक्य झाल्याचे सांगत त्यांच्या अनुपस्थितीतही शुभेच्छा असल्याचे नमूद केले. तसेच शंभर दिवसांच्या स्वच्छता मोहिमेच्या प्रभावी अंम लबजावणीबद्दल स्वच्छता सभापती, नगराध्यक्षा, उपनगराध्यक्षा, स्वच्छता कर्मचारी यांचे अभिनंदन केले. त्यांनी

तर दिनांक १४ एप्रिल २०२६ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालय व अभ्यासिका केंद्र, तळवेस आणि शासकीय उपजिल्हा रुग्णालय येथे पिण्याचे पाणी फिल्टर प्लांट यांचे लोकार्पण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा स्वाती सचिन हुडे या होत्या. यावेळी उपनगराध्यक्षा शितल नरसिंग शिंदे, बांधकाम समिती सभापती राजकुमार भालेराव, स्वच्छता समिती सभापती राजकुमार हुडगे, सभापती

अध्यक्षीय सम रोपात नगराध्यक्षा स्वाती सचिन हुडे यांनी उदगीर शहरासाठी हा दिवस अभिमानाचा असल्याचे सांगत, ङ्गआपण केवळ इम रतींचे उद्घाटन करत नाही, तर शहराच्या प्रगतीला नवी दिशा देत आहोत, ङ्ख असे प्रतिपादन केले. अशोकस्तंभ हा आपल्या गौरवशाली इतिहासाची साक्ष देणारा प्रतीक असल्याचे त्यांनी सांगितले. रमाई व प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत अनेक कुटुंबांना हक्काचे घर मिळत असल्याने त्यांचे जीवनमान उंचावत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

आंबेडकर वाचनालय व अभ्यासिका केंद्र सुरू झाले असून ते युवकांसाठी ज्ञानाचे भांडार ठरेल, स्पर्धा परीक्षेच्या तयारी करिता सुसज्ज व सर्व सुविधायुक्त अभ्यासिकेचा वापर करून भविष्यात उदगीर शहरातील अधिकारी होण्याचा टक्का आणखी वाढवा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला. शासकीय उपजिल्हा रुग्णालयात सुरू झालेल्या वॉटर फिल्टर प्लांटमुळे रुग्णांना शुद्ध पाणी मिळणार असल्याचे सांगत आरोग्य व स्वच्छतेसाठी नागरिकांनी सहकार्य करावे, आवाहन त्यांनी केले. माझे शहर, माझी जबाबदारी या संकल्पनेतून स्वच्छता सहभागी होण्याचे आवाहन करत त्यांनी व्यापारी व नागरिकांना आपला कचरा इतरत्र न टाकता तो घंटागाडी मध्ये देवून सहकार्य करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी स्वरुपात रमाई व प्रधानमंत्री आवास लाभार्थी बाबुराव मरेप्पा चौधरी व शोभा सुरेश चौधरी यांना प्रत्येकी पन्नास मोहिमेत प्रातिनिधिक योजनेतील

वितरण करण्यात आले. तर मैनाबाई जगन्नाथ गायकवाड व विनोद मारुती कोरनुळे यांना घरकुलाच्या चाव्यांचे वितरण करण्यात आले. तसेच अनिल पंढरीनाथ गायकवाड व सुनिल पंढरीनाथ गायकवाड यांच्या घरकुलाचा गृहप्रवेशही म असान्यवरांच्या उपस्थित संपन्न झाले

यावेळी मुख्याधिकारी सोम नाथ जाधव यांनी मनोगत व्यक्त करताना नगरपरिषद शहर विकासासाठी कटिबद्ध असून नागरिकांनी वेळेवर कर भरून सहकार्य करावे असे आवाहन केले.

## श्री संत गोविंद माऊली यात्रेनिमित्त वांजरवाड्यात जंगी कुस्त्यांचा थरार



**तभा वृत्तसेवा**

**जळकोट दि.१७ एप्रिल :** तालुक्यातील वांजरवाडा येथे श्री संत गोविंद माऊली यात्रेनिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही जंगी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या कुस्ती स्पर्धेला परिसरातील हजारो कुस्तीप्रेमींनी मोठ्या उत्साहात उपस्थिती लावली. प्रत्येक कुस्तीला प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाटात उत्तम प्रतिसाद दिला.

स्पर्धेतील शेवटची आणि सर्वात रंगतदार कुस्ती शुभम पाटील (गाढवेवाडी) विरुद्ध सय्यद अंजीम (सोनवळा) यांच्यात रंगली. या कुस्तीमध्ये दोन्ही मल्लांनी जोरदार झुंज दिली. अखेर शुभम पाटील यांनी आपल्या दमदार डावपेचांच्या जोरावर विजय मिळवत फड गाजवला.या वेळी प्रमुख जिल्हा परिषद सदस्य धर्मपाल देवशेटे नगरसेवक संजय देशमुख, उमाकांत ईमडे, तसेच गावातील सरपंच अविनाश नळंदवार, तंटामुक्ती अध्यक्ष पुंडलिक खंदाडे, रघुनाथ देशमुख, दत्ता इंदुरे, गोविंद बनाळे, राजु कदम, बाळु केसाळे, रामसिंग ठाकूर, राहुल शिवनगे, वैभव गुरमे, माधव शिवनगे, गंगाधर ताकबीडे, राम परीठ,विनोद टाले, चांद शेख, मंगेश गोरे,गोपाळ केसाळे,व्यंकट अंबिलवाड,गजानंद शेवटे, विठ्ठल पदमल्लेय,गोपाळ यलपुरवाड आदींसह समस्त गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिवसभर चाललेल्या या कुस्त्यांच्या फडात स्थानिक तसेच बाहेरगावाहून आलेल्या नामांकित मल्लांनी आपली ताकद आणि कौशल्य दाखवत प्रेक्षकांची मने जिंकली. स्पर्धा यशस्वीपणे पार पडल्याबद्दल आयोजकांचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

## औसा शिक्षक पतसंस्थेचा दैदीप्यमान विकास कौतुकास्पद : खा. ओमराजे

### औसा शिक्षक पतसंस्थेच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त रक्तदान शिबीर




**तभा वृत्तसेवा**

**औसा दि.१७ एप्रिल :** गेल्या १२ वर्षापासून औसा तालुका शिक्षक सहकारी पतसंस्था वर्धापन दिन, महात्मा ज्योतिबा फुले व महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करीत असून यानिमित्ताने लातूर जिल्ह्यातील रुग्णांना रक्ताचा तुटवडा होवू नये. यासाठी रक्तदान शिबीराचे आयोजन करत आहे. यावर्षी आयोजित करण्यात आलेले रक्तदान शिबिर उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले असून शिक्षक पतसंस्थेचा झालेला दैदीप्यमान विकास कौतुकास्पद असल्याचे मत खासदार ओमराजे निंबाळकर यांनी व्यक्त केले.

रक्तदान शिबिराचे उद्घाटन धाराशिव लोकसभा मतदारसंघाचे खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या हस्ते करण्यात आले. पतसंस्थेचे चेअरमन महादेव खिचडे अध्यक्षस्थानी होते. संतोष सोमवंशी, अमर खानापुरे, विक्रम पाटील, जयश्रीताई उटगे, सुरेशदादा भुरे, बंडू कोद्रे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते.

खासदार ओमराजे निबाळकर म्हणाले, महान व्यक्तींच्या जयंतीनिमित्त गेल्या १२ वर्षापासून औसा शिक्षक पतसंस्था रक्तदान शिबीर आयोजित करते हे कौतुकास्पद आहे. आजच्या काळात पतसंस्था चालवणे खूप अडचणीचे आहे. त्याहून सलगपणे उपक्रम राबविणे त्यापेक्षाही अवघड आहे. कारण मी ही पूर्वी पतसंस्था चालवलेली आहे. त्यामध्ये किती अडचणी येतात आणि कोणत्या अडचणीतून जावं लागतं. हे मला खूप जवळून पाहिले आहे. त्यासोबत या पतसंस्थेने मॅरेथॉन स्पर्धा, महिलांच्या विविध खेळाच्या स्पर्धा, स्वरचित काव्य स्पर्धा राबवल्याबद्दल पतसंस्थेच्या संचालक मंडळाचे अभिनंदन करून मॅरेथॉन स्पर्धा प्रत्येक वर्षी यापुढे घ्याव्यात अशी सूचना त्यांनी यावेळी केली. रक्तदान हेच श्रेष्ठ दान असून यामुळे अनेकांना नवजीवन मिळते. प्रत्येकांनी आरोग्याची काळजी घ्यावी, दररोज व्यायाम करावा व निरोगी राहावे.असा सल्ला देत अनेक उदाहरणे यावेळी दिली. या शिबिरामध्ये ९५ शिक्षक रक्तदात्यांनी स्वेच्छेने सहभाग नोंदविला . व्हा. चेअरमन हरीश आयतनबोने यांनी सुत्रसंचालन केले, तर सचिव संजय जगताप यांनी उपस्थितांचे आभार मानले. संचालक युसुफ पिरजादे, मधुकर गोरे, रमेश जाधव, महेश कांबळे, अमोल शेळके, दिपक डोंगरे, संजय रोडगे, संचालिका मंदाकिनी माने, संगीता कानडे, पतसंस्थेचे कर्मचारी मल्हारी कांबळे, शिरीष पवार, विनय आयतनबोने यांनी कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी पुढाकार घेतला.या रक्तदान शिबिराच्या माध्यमातून गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळणार असून, या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन यांनी मांडलेले दोन्ही प्रश्न येर्णाऱ्या लोकसभेच्या अधिवेशनात मांडून सोडविणार असल्याचा ठाम विश्वास यावेळी औसा तालुक्यातील शिक्षकांना खासदार ओमराजे निंबाळकर यांनी दिला आहे.

**शिक्षकांचे प्रश्न सोडवावेत – महादेव खिचडे**

**जिल्हा परिषदेच्या शिक्षकांना सर्वोच्च न्यायालयाने TETपरिक्षा उतीर्ण होणे आता अनिवार्य केले आहे. व शिक्षकांना मिळत असलेल्या बिलावर इनकम टक्स द्यावे लागत आहे. या दोन प्रश्नांची सोडवणुक लोकसभेतून करावी. अशा मागण्या शिक्षकांच्या वतीने चेअरमन महादेव खिचडे यांनी खासदार ओमराजे निंबाळकर यांच्याकडे यावेळी केल्या.**

## श्री संत गोरोबाकाका यांची ७०९ वी पुण्यतिथी साजरी

**तभा. वृत्तसेवा**

**अहमदपूर दि. १७ एप्रिल :** तालुक्यातील तळेगाव येथे गोरोबा काका पुण्यतिथीनिमित्त १४ एप्रिल रोजी सायंकाळी हरी जागर व गवळणी घेण्यात आल्या तसेच ह. भ. प. प्रबोधनकार घनश्यम महाराज हिवरेकर, यांचे गोरोबाकाका यांच्या चारित्र्यावर कीर्तन झाले पुण्यतिथीचा सोहळा सतरा वर्षापासून चालत असल्यामुळे, महाराजांनी शिवसेना जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी व तळेगाव वाशियाकडून संत गोरोबाकाका मंदिराची स्थापना व्हावी अशी इच्छा व्यक्त केली किर्तना नंतर गुलाल उधळून

महआरती करण्यात आली व महाप्रसाद अन्नदान करण्यात आले कार्यक्रमास

श्री बालाजी रेड्डी, शिवसेना जिल्हाप्रमुख लातूर, राजुर तालुकाप्रमुख दत्ताभाऊ हेंगणे, कार्यालय प्रमुख सुभाष,गुंडीले, बाळासाहेब पडिले ,महात्मा गांधी कॉलेज चे उपप्राचार्य प्रभाकर बाबुळगावकर, प्राध्यापक अण्णाराव कुमठेकर, जलसंधारणचे लिपिक संदीप पाळणाटे, महात्मा फुले चे सुमित कुमठेकर,पत्रकार विष्णू पोले, ग्रा.पं.तळेगाव येथील उपसरपंच माधवराव शेळके, चेअरमन विश्र्वंभर पवार, माजी तंटामुक्त अध्यक्ष अरविंद दापके,ह-भ-प भास्कर महाराज, मदन महाराज,जेस्ट शिवसैनिक दामोदर घोरपडे, बालासाहेब शेळके, , वाघंबर चोपणे, हेमंत शेळके, बलभीम शेळके, परमेश्र्वर शेळके, पांडुरंग चोपणे,बालाजी चामवाड, गणेश मित्र मंडळाचे नामदेव शेळके, तानाजी घोरपडे, विजय शेळके, लखन काकडे, संतोष पेंढारकर, गायक रुखमाजी,व जयवंत कदम,रामचंद्र गुंजरगे,



लहू बारवाड अखिल महाराष्ट्र कुंभार समाजाचे कार्याध्यक्ष बाळासाहेब राजे, सचिव आकाश पळणाटे ,उपाध्यक्ष करण येरमुरे, सदस्य पांडू तेलंग, सहशिक्षिका कुमठेकर, प्रतीक्षा पळणाटे,सुरेखा गुंजर्गे, सुलोचना पळणाटे,सुरेखा चोपने, गावातील व पंचक्रोशीतील भाविक भक्त यांनी कार्यक्रमाचा लाभ घेतला कार्यक्रमाचे आयोजन अखिल महाराष्ट्र कुंभार समाज तालुका अध्यक्ष पद्माकर पेंढारकर .याचे प्रमाणे गावकरी उपस्थित होते

## बाबासाहेब आंबेडकरांना विचारांनी अभिवादन

**तभा वृत्तसेवा**

**जळकोट दि.१७ एप्रिल :**आंबेडकरवाद आता देशातील सर्व शोषित, पीडित आणि वंचितांची 'राष्ट्रभाषा' बनत आहे. डॉ. आंबेडकरांचा राष्ट्रवाद हाच खरा राष्ट्रवाद आहे, हे सत्य भारतीयांना समजत आहे. यापासून जे दूर आहेत, त्यांना हे सत्य समजेल त्या दिवशी भारतात खऱ्या अर्थाने न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाचे राज्य आल्याशिवाय राहणार नाही. असे प्रतिपादन शासननियुक्त ग्राहक संरक्षण परिषदेचे अशासकीय सदस्य तथा दलितमित्र बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर यांनी केले. अतनूर ता.जळकोट येथे जनक्रांती डोंगरी विकास बहुउद्देशीय सेवाभावी संस्था अतनूर, ग्राहक जनजागरण व मार्गदर्शन समिती महाराष्ट्र राज्य, वसुंधरा महिला मंडळ व जिजामाता महिला मंडळ अतनूरच्या वतीने आयोजित ' सामाजिक समता सप्ताहाच्या ' उत्साहात दि. १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विचारांनी अभिवादन करण्यात आले. यावेळी दलितमित्र बालासाहेब शिंदे बोलत होते.

यावेळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अतनूर येथील उपरोक्त सेवाभावी संस्थेच्यावतीने कार्यालयात 'सामाजिक समता सप्ताह'अंतर्गत प्रेरणादायी व्याख्यान, संविधान प्रास्ताविक वाचन आणि निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

## किलबिल ची CBSE बोर्ड परीक्षेच्या उज्वल निकालाची परंपरा कायम



**तभा. वृत्तसेवा**

**अहमदपूर दि. १७ एप्रिल :** नुकताच १० वी CBSE बोर्ड परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, त्यामध्ये शाळेचा गुणवंत विद्यार्थी

आरुष अविनाश माने याने ९७.२०टक्के गुण घेऊन शाळेतून सर्वप्रथम येण्याचा बहुमान पटकावला आहे. तर राजवीर धैर्यशील देशमुख या विद्यार्थाने ९५.०० टक्के गुण घेऊन द्वितीय तर सत्यवान प्रभाकर नागरगोजे याने ९४.८० टक्के गुण घेऊन सर्व तृतीय व त्याचबरोबर श्रिया लक्ष्मीकांत भुतडा व शिवम रमेश केंद्रे यांनी ९४.४० टक्के गुण घेऊन चौथा क्रमांक पटकावत घवघवीत यश संपादित केले.

शाळेचे एकूण ७७ विद्यार्थी विशेष प्राविण्यसह गुण मिळवून मोठे यश संपादित केले आहे. सदरील बोर्ड परीक्षेमध्ये शाळेचे एकूण १११ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना परवेज शेख, श्रीधर अडिके,राजेंद्र परगे, बालाजी भोगे, प्रकाश कांबळे, श्रीकांत वलांडे , एजाज शेख, नेहा शर्मा , आशिष देशमुख, रंजनकुमार यादव , ओमकार पोहरे, प्रतिभा सूर्यवंशी आदी तज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

त्याबद्दल सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव ज्ञानोबा भोसले, प्राचार्य संतोष पाटील, उपप्राचार्य धरमसिंग शिराळे , समन्वयक लक्ष्मण थोटे आदी मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

CMYK

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## कदेर येथे डॉ. आंबेडकर जयंतीपूर्वी विचारप्रबोधन कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१६ एप्रिल -**
उमरगा तालुक्यातील कदेर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला विचारप्रबोधनपर कार्यक्रम उत्साहात पार पडला.

यावेळी ॲड. शीतल चव्हाण यांनी प्रभावी व्याख्यानातून बाबासाहेबांच्या संघर्षमय जीवनाचा व क्रांतिकारी विचारांचा वेध घेत उपस्थितांना प्रेरित केले.

कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजन व अभिवादनाने झाली.

आपल्या भाषणात त्यांनी बाबासाहेबांच्या कार्याची जागतिक व्याप्ती अधोरेखित करत एर्वीलरींश, सळींरींश, जीसरपळश या मंत्राचे महत्त्व सांगितले. संविधान हे सामाजिक न्यायाचा जिवंत दस्तऐवज असल्याचे त्यांनी नमूद करत त्यांच्या विचारांचे आचरण करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एल. डी. गायकवाड होते. यावेळी महिला नागरिक व बौद्ध उपासक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रत्नाकर गायकवाड यांनी केले, तर आभार प्रदर्शन ओम संजय कांबळे यांनी मानले.



## संक्षिप्त वृत्त...



### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त उमरग्यात अभिवादन

**उमरगा, दि.१६ एप्रिल -**
भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त उमरगा शहरात विविध ठिकाणी अभिवादन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.नगर परिषद उमरगा येथे झालेल्या कार्यक्रमात माजी मंत्री बसवराज पाटील यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी पंचायत समिती सदस्य कैलास शिंदे, दिलीप भालेराव, अनिल सगर, हरीश डावरे, महेश माशाळकर यांच्यासह अनेक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी एकत्र येत डॉ. आंबेडकरांना अभिवादन करत त्यांच्या विचारांचे आचरण करण्याचा संकल्प केला.



### युथ फाउंडेशनतर्फे डॉ. आंबेडकर यांना अभिवादन

**उमरगा, दि.१६ एप्रिल -**
उमरगा येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त युथ फाउंडेशन उमरगा यांच्या वतीने अभिवादन कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून बसवराज पाटील उपस्थित होते. तसेच दिलीप भालेराव, सतीश सुरवसे, पप्पू सगर, प्रा. शोकत पटेल, विक्रम मस्के, सुवर्णा भालेराव, अनिता सरपे, संगीता पाटील आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी युथ फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. उपस्थितांनी डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचे स्मरण करून त्यांच्या कार्याला अभिवादन केले.



### आर्य चाणक्य विद्यालयात आंबेडकर जयंती साजरी

**धाराशिव, दि.१६ एप्रिल -**
धाराशिव शहरातील आर्य चाणक्य माध्यमिक विद्यालयात भारतरत्न महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने संपन्न झाला.यानिमित्ताने डॉक्टर आंबेडकर यांच्या जीवनातील अनेक प्रसंग आणि माहिती प्रशालेचे श्री बाबासाहेब जगताप सर यांनी सर्वांसमोर मांडली. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन सामाजिक सुधारणांसाठी काम करणारे बाबासाहेब आंबेडकर हे युगपुरुष म्हणून गणले गेल्यामुळे त्यांचे कार्य प्रेरणादायी असल्याची त्यांनी सांगितले. यावेळी प्रशालेतील सर्व शिक्षक शिक्षिका उपस्थित होते.



### भीमनगर नाईचाकूर येथे डॉ. आंबेडकरांना अभिवादन

**उमरगा, दि.१६ एप्रिल -**
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त भीमनगर नाईचाकूर येथे अभिवादनाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. प्रारंभी प्राचार्य डॉ. दिलीप गरुड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर उपस्थित मान्यवरांनी बाबासाहेबांच्या विचारांना उजाळा देत सामाजिक समतेचा संदेश दिला. यावेळी अशोकसिंह पवार, गोविंदराव पवार, किसन कांबळे, केशव पवार, रावसाहेब पवार, शेषराव पवार, नामदेव पवार, शिवाजी पवार, सिद्धेश्वर माने, चंद्रकांत स्वामी, आदींसह बौद्ध उपासक-उपासिका उपस्थित होते.

### तुळजापूरात अवैध दारू विक्री

**तुळजापूर, दि.१६ एप्रिल -**
वडार गल्ली परिसरात अवैध दारू विक्रीप्रकरणी एका युवकाविरुद्ध तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, कृष्णा नागनाथ माने (वय १९, रा. डिग्गी रोड, उमरगा) हा १४ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास वडार गल्ली, तुळजापूर येथे अंदाजे ७२० रुपयांच्या देशी दारूसह अवैध विक्रीच्या उद्देशाने आढळून आला.

## महिला बचत गटांसाठी 'कृषी औजार बँक' योजनेची संधी

### ६० टक्के अनुदान; कमाल २४ लाख रुपये

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१६ एप्रिल -**
नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा)च्या दुसऱ्या टप्प्यांतर्गत धाराशिव जिल्ह्यातील महिला बचत गटांसाठी कृषी क्षेत्रात स्वावलंबनाची नवी दारे खुली झाली आहेत. गावपातळीवर 'कृषी औजार बँक' स्थापन करण्यासाठी प्रकल्प मूल्याच्या ६० टक्क्यांपर्यंत, कमाल २४ लाख रुपयांचे अनुदान उपलब्ध करून दिले जाणार असल्याची माहिती प्रभारी प्रकल्प संचालक (आत्मा) विष्णू मिसाळ यांनी दिली.



या योजनेचा लाभ प्रकल्प गावांमधील 'उमेद' व माविम पुरस्कृत महिला बचत गट तसेच महिलांचे गाव संघ यांना मिळणार आहे. लाभासाठी संबंधित गटात किमान १० सदस्य असणे आवश्यक असून, हे सदस्य वेगवेगळ्या कुटुंबांतील असावेत.

ज्या गटांनी यापूर्वी इतर कोणत्याही शासकीय योजनेतून कृषी औजार बँकेचा लाभ घेतला आहे, त्यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही.

प्रत्येक गावातून केवळ एका महिला गटाची निवड केली जाणार असून, एकापेक्षा अधिक अर्ज आल्यास लाभार्थींची निवड लॉटरी पद्धतीने केली जाईल. तसेच, प्रकल्पाची एकूण किंमत २० लाख रुपयांपेक्षा जास्त असल्यास राष्ट्रीयकृत बँकेकडून ७५ टक्के कर्ज घेणे बंधनकारक राहणार आहे.

निवड झालेल्या गटांना आधुनिक कृषी यंत्रसामग्री खरेदीची संधी मिळणार आहे. यात ट्रॅक्टर, ट्रॅक्टरचलित औजारे, बीबीएफ यंत्र, रोपणी व लावणी यंत्र, मल्चिंग मशीन, कंबाईन हार्वेस्टर तसेच फवारणी पंप यांचा समावेश आहे. यामुळे कृषी कामांमध्ये वेग, अचूकता आणि उत्पादकता वाढण्यास मदत होणार आहे.

इच्छुक महिला बचत गटांनी प्रकल्पाच्या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज सादर करावेत.

अधिक माहितीसाठी संबंधित प्रकल्प गावातील कृषी अधिकारी, समूह सहाय्यक तसेच तालुका कृषी कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन प्रकल्प संचालक (आत्मा) विष्णू मिसाळ यांनी केले आहे.

## डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्याकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ एप्रिल -**
भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शहरातील विविध ठिकाणी अभिवादन कार्यक्रम उत्साहात पार पडले. प्रमुख चौक, स्मारके व सार्वजनिक ठिकाणी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.



यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस (श.प) पक्षाचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील व जेष्ठ नेते जीवनराव गोरे यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून समता, न्याय व बंधुतेच्या मूल्यांना बळकट करण्याचा संकल्प व्यक्त केला. संविधानिक मूल्यांचे पालन करण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

कार्यक्रमात खलिफा कुरेशी, अयाज (बबलू) शेख, पंकज भोसले, सुनील आंबेकर, सर्फराज कुरेशी, इस्माईल शेख, शेखर घोडके, डॉ. अविनाश तांबारे, जयंतराव देशमुख, नरसिंह मेटकरी, ॲड. योगेश सोने पाटील, ॲड. अविनाश जाधव आदींसह अनेक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पोद्दार जम्बो किड्स स्कूलचे उद्घाटन




**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१६ एप्रिल -**
उमरगा तालुक्यातील मुरूम येथे पोद्दार जम्बो किड्स प्री-प्रायमरी व प्रायमरी स्कूलचा उद्घाटन सोहळा उत्साहात पार पडला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक व दर्जेदार शिक्षण देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या या शाळेमुळे परिसरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष बाबुराव माधवराव पाटील होते, तर शरण बसवराज पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी रशीद शेख, योगेश राठोड, रम्या तुतिका, युवराज गायकवाड, पद्माकर पाटील, ड. प्रभाकर पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते शाळेचे उद्घाटन करण्यात आले. प्रास्ताविकात मंजिरी सूर्यवंशी व मुख्याध्यापिका रम्या तुतिका यांनी शाळेची संकल्पना व आधुनिक शिक्षणपद्धतीची माहिती दिली. या उद्घाटन सोहळ्यास पालक, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## येरमाळा येथे 'निरंतर वाचन' उपक्रम; विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृतीला चालना



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.१६ एप्रिल -**
महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त येरमाळा येथे ज्ञान, प्रेरणा आणि सामाजिक जाणीव जागृत करणारा 'निरंतर वाचन' हा उपक्रम उत्साहात पार पडला. कै. रावसाहेब थोरबोले स्मृती वाचनालयाच्या वतीने आयोजित या उपक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृतीची बीजे रुजवली.

या उपक्रमात येरमाळा परिसरातील ७० हून अधिक विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेत विविध समाजसुधारक, विचारवंत आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांवरील पुस्तके वाचून बाबासाहेबांना अभिवादन केले. दिवसभर वाचनालयात शांत, एकाग्र आणि अभ्यासपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. 'वाचनातून विचार आणि विचारातून परिवर्तन' हा संदेश या उपक्रमातून प्रभावीपणे देण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रसंगी येडाई व्यसनमुक्ती केंद्राचे संचालक डॉ. संदीप तांबारे, सरपंच विशाल बारकुल, पंचायत समिती सदस्य राहुल पाटील, कुंदन भैया कांबळे, संतोष गायके, बालाजी बारकुल, गोरख बारकुल, आदित्य मोरे, श्री जंगम आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीमुळे विद्यार्थ्यांना अधिक प्रेरणा मिळाली.

मार्गदर्शन करताना डॉ. संदीप तांबारे यांनी विद्यार्थ्यांनी केवळ पाठ्यपुस्तकांपुरते मर्यादित न राहता समाजसुधारकांचे विचार आत्मसात करावेत, असे आवाहन केले. वाचन हीच व्यक्तिमत्त्व विकासाची गुरुकिल्ली असून, विचारांचे दालन उघडणारे सर्वात प्रभावी साधन म्हणजे पुस्तके, असे त्यांनी सांगितले. कुंदन भैया कांबळे यांनी वाचाल तर वाचाल, वाचनातूनच खरी क्रांती घडते, असे सांगत सातत्यपूर्ण वाचनाचे महत्त्व अधोरेखित केले.

हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी अमोल बारकुल यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे आभार संतोष गायके यांनी मानले.

## कदेर येथे हानामारी; पोलिसात गुन्हा दाखल

**उमरगा, दि.१६ एप्रिल -**
कदेर येथे किरकोळ वादातून झालेल्या मारहाणीप्रकरणी दोघांविरुद्ध उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

विनोद कलशेट्टी व सुनंदा कलेशेट्टी (दोघे रा.कदेर,) यांनी १४ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास मारुती मंदिराजवळ दुध डेअरी परिसरात फिर्यादी अमोल क्रांतीवीर कलशेट्टी (वय ४०, रा. कदेर) यांच्याशी वाद घातला. यावेळी आरोपी विनोद कलशेट्टी यांनी फिर्यादीला शिवीगाळ केल्याच्या कारणावरून दुधाचे कॅन मारून जखमी केले.

## रा.प. महाविद्यालयात डॉ. आंबेडकर जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ एप्रिल -**
१४ एप्रिल रोजी रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. प्राचार्य डॉ. संदीप देशमुख यांच्या हस्ते प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले.



यावेळी मराठी विभाग प्रमुख प्रा. राजा जगताप यांनी शेतकरी व महिलांचे कैवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विषयावर व्याख्यान देत बाबासाहेबांच्या कार्याचा सखोल वेध घेतला. त्यांनी समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित करत महिलां व शेतकऱ्यांसाठी बाबासाहेबांचे योगदान स्पष्ट केले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. संदीप देशमुख यांनी बाबासाहेबांचे विचार तळागाळापर्यंत पोहोचवण्याचे आवाहन केले. प्रतिकूल परिस्थितीतही संघर्ष करत पुढे जाण्याचा संदेश त्यांनी दिला.

कार्यक्रमास प्रा. सचिन चव्हाण, प्रा. बबन सूर्यवंशी, प्रा. माधव उगिले, डॉ. केशव क्षीरसागर, सुमेर कांबळे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. विवेकानंद चव्हाण यांनी केले, तर आभार प्रा. डॉ. बालाजी गुंड यांनी मानले.

## व्यवस्थापकांच्या व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह; बदलीची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१६ एप्रिल -**
तुळजाभवानी देवीच्या दर्शन व्यवस्थेचे नियोजन कोलमडल्याचा आरोप करत काही पुजाऱ्यांनी श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानातील सध्याच्या व्यवस्थापक तथा तहसीलदार माया माने यांची चौकशी करून तात्काळ बदली करण्याची मागणी केली आहे.

यासंदर्भात जिल्हाधिकारी तथा मंदिर संस्थानचे अध्यक्ष कीर्ती किरण पुजार यांना निवेदन सादर करण्यात आले आहे.




सदरील दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, गेल्या काही दिवसांपासून मंदिर व्यवस्थापन, दर्शन व्यवस्था व भाविकांच्या सुविधांकडे दुर्लक्ष होत आहे.

विशेषतः चैत्री पौर्णिमा यात्रेदरम्यान योग्य नियोजनाअभावी अनेक भाविकांना दर्शनापासून वंचित राहावे लागले, तसेच महिला सुरक्षा रक्षकांकडून गैरवर्तन झाल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

याशिवाय मंदिर परिसरातील वादप्रसंग, वाढती गर्दी व रांग व्यवस्थापनातील त्रुटी याकडे दुर्लक्ष झाल्याचे सांगण्यात आले. बोगस पुजाऱ्यांचा वाढता सुळसुळाट, व्हीआयपी पासचा गैरवापर आणि अतिक्रमण यांची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

या सर्व बाबींची सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांची तात्काळ बदली करावी, अशी मागणी करण्यात आली असून, निवेदनावर बाळासाहेब भोसले, दिगंबर खुंटाफळे, विकास शिंदे, अण्णासाहेब क्षीरसागर यांची स्वाक्षरी आहे.

## ईट येथे राज्यस्तरीय नृत्य स्पर्धेचा जल्लोषविजय



**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१६ एप्रिल -**
तालुक्यातील ईट येथे आयोजित राज्यस्तरीय नृत्य स्पर्धेत कलाकारांनी आपल्या दमदार सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात पार पडलेल्या या भव्य स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी प्रौढ गटातील वैयक्तिक व सामूहिक सादरीकरण रंगले.

या स्पर्धेत आदिवासी नृत्य, गोंधळी नृत्य, भजन यांसारख्या पारंपरिक कलाप्रकारांना आधुनिक नृत्यशैलीची जोड देत कलाकारांनी बहारदार सादरीकरण केले. वैयक्तिक गटात सानिका भागवत यांनी प्रथम क्रमांक पटकावत २५ हजार रुपयांचे बक्षीस मिळविले. अभि घोडके यांनी २१ हजार रुपयांसह द्वितीय, तर गणेश पवार यांनी ११ हजार रुपयांसह तृतीय क्रमांक मिळविला. इब्राहिम शेख व स्नेहा दुधाळ यांना ७ हजार रुपयांचे उत्तेजनार्थ पारितोषिक प्रदान करण्यात आले.

### सानिका भागवत व 'स्कॉट ड्यूटी फोर' ग्रुपचा विजय

प्रौढ समूह गटात लातूरच्या 'स्कॉट ड्यूटी फोर' ग्रुपने ५१ हजार रुपयांचे प्रथम बक्षीस पटकावले. कराडच्या 'डीटूडी क्वीन्स' यांनी ३१ हजार रुपयांसह द्वितीय, तर पुण्याच्या 'एंजल डान्स ग्रुप अकॅडमी'ने २१ हजार रुपयांसह तृतीय क्रमांक मिळविला. बार्शीच्या 'भगवंत कला मंच' व बीडच्या 'कला श्री डान्स ग्रुप' यांना उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले.

माजी मंत्री आमदार डॉ. तानाजीराव सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली भूम कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रवीण देशमुख यांनी या स्पर्धेचे आयोजन केले होते. राज्यभरातील विविध भागांतून स्पर्धकांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदविला.

स्पर्धेचे परीक्षण रोहित राठोड (मुंबई) व सिद्धी गाडेकर (शिर्डी) यांनी केले. कार्यक्रमाचे निवेदन ऐश्वर्या हिबारे व डॉ. हनुमंत गवळी यांनी प्रभावीपणे सांभाळले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी प्रवीण देशमुख, गोरख शिंदे, अक्षय शिंदे, बंटी देशमुख, ईश्वर देशमुख यांच्यासह युवा मंच व मित्रमंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.



धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## निपाणी येथे हरिनाम सप्ताहानिमित्त रक्तदान शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१६ एप्रिल -**

विश्व जन आरोग्य सेवा समिती महाराष्ट्र राज्य, तेजस्वी फाउंडेशन पुणे व गावकरी तरुण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने निपाणी (ता. भूम) येथे दि. १४ एप्रिल २०२६ रोजी अखंड हरिनाम सप्ताहानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.



या शिबिराचे उद्घाटन हभप. गिरीधर सामनगावकर व हभप. मेघराज सामनगावकर यांच्या हस्ते करण्यात आले. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी अनेकांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले.

कार्यक्रमास जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे शाखा व्यवस्थापक भाऊसाहेब शिंद, ज्ञानेश्वर लहाने, जयराम भोसले, रामभाऊ पाटील, बब्रुवान गुळवे, अमोल अनभुले, अनंत पाटील, महारुद्र राऊत, ज्ञानेश्वर गुळवे, बळीराम शिंदे, नामदेव अनभुले, अविनाश अनभुले, अजिंक्य अनभुले, बळीराम काळे, सोमनाथ कोकाटे आदी मान्यवर उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...

### संत मीरा पब्लिक स्कूलमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**परंडा, दि.१६ एप्रिल -**

संत मीरा पब्लिक स्कूल येथे मंथन जनरल नॉलेज व इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड परीक्षेत उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा उत्साहात सत्कार करण्यात आला. मंथन परीक्षेत ईश्वरी विष्णू साबळे हिने केंद्रात प्रथम व राज्यात तृतीय क्रमांक, तर श्रेयस चंद्रकांत सूर्यवंशी याने केंद्रात द्वितीय क्रमांक पटकावला. तसेच शौर्य खुळे, जयेश बेदमुथा, राहुल गेळे, भक्ती खराडे, सलोनी जाधव व फातिमा हन्नूरे यांनीही उत्कृष्ट यश मिळवले. इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाडमध्ये आरुषी पाटील हिने राज्यात ८ वा, तर सिद्धी भिलारे हिने १५ वा क्रमांक मिळवला. इतर विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय गुण मिळवले. यावेळी मुख्याध्यापक संतोष भांडवलकर व शिक्षकांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांना सुमय्या शेख, प्रीती देशपांडे, माधुरी नांगरे आदी शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

### उमरग्यात हरीनाम सप्ताह सोहळ्याची सांगता

**उमरगा, दि.१६ एप्रिल -**

ओंकार नगरमध्ये गेल्या ४१ वर्षांपासून सुरू असलेला अखंड हरीनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा यंदाही भक्तीमय वातावरणात उत्साहात पार पडला. संपूर्ण सप्ताहभर नामस्मरण, भजन, कीर्तन व प्रवचनांचा सुरेल संगम अनुभवायला मिळाला. विविध भागांतून आलेल्या कीर्तनकार व प्रवचनकारांनी भक्ती, अध्यात्म व सदाचाराचा संदेश दिला. भगवताचार्य आनंद महाराज, निळकंठ महाराज व सत्यवान महाराज यांच्या कीर्तनांनी भाविक मंत्रमुग्ध झाले. संगीत क्षेत्रातील भागवत महाराज, कृष्णा महाराज येळवटकर व सोपान महाराज यांनी आपल्या गायन-वादनातून वातावरण अधिक भक्तिमय केले. १४ एप्रिल रोजी सप्ताहाची सांगता करण्यात आली असून, महाप्रसादाचा लाभ असंख्य भाविकांनी घेतला. कार्यक्रमाचे नियोजन गोविंद महामुनी, भरत पांचाळ, कृष्णा पांचाळ आदींसह ग्रामस्थांनी केले.

### टायर दुकानाला आग; लाखोचे नुकसान

**वाशी, दि.१६ एप्रिल -**

वाशी तालुक्यातील पारडी येथे शुभम टायर वर्क्स या टायर दुकानाला (दि.१४) एप्रिल रोजी संध्याकाळी शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची घटना घडली. या आगीत दुकानातील टायरसह इतर साहित्य जळून खाक झाले असून लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, विद्युत शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची प्राथमिक शक्यता वर्तवण्यात येत आहे. आगीने काही वेळातच विक्राळ रूप धारण केल्याने दुकानातील मोठ्या प्रमाणावर टायर आणि साहित्य जळून गेले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, अधिक तपास सुरू आहे.

### नळदुर्गमध्ये गारमेंट कारखान्यात चोरी

**नळदुर्ग, दि.१६ एप्रिल -**

जगताप नगर येथील अस्फान गारमेंट कारखान्यात अज्ञात चोरट्यांनी ज्वारी व महत्त्वाची कागदपत्रे चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याबाबत फिर्यादी जुबेर पाशा सज्जादमिया जहागीरदार (वय ४५, रा. इनामदार गल्ली, नळदुर्ग) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, १२ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६ ते १४ एप्रिल रोजी सकाळी ११ या दरम्यान अज्ञात व्यक्तीने कारखान्यात ठेवलेली सुमारे ६ क्विंटल ज्वारी तसेच कपाटातील कारखान्याची कागदपत्रे व फाईल चोरून नेली. या प्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३३१(३), ३३१(४), ३०५ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## अनैतिक संबंधातून पत्नी व प्रियकराकडून पतीचा खून

**मंगरूळ येथील तरूणाच्या खून प्रकरणाचा पोलिसांकडून २४ तासांत उलगडा...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ एप्रिल -**

तालुक्यातील मंगरूळ येथील कृष्णाथ आनंद साठे (वय ३६) यांच्या निघृण खून प्रकरणाचा अवघ्या २४ तासांत छडा लावण्यात तुळजापूर पोलिसांना यश आले आहे. या प्रकरणी पोलिसांनी मयताची पत्नी प्रतिभा कृष्णाथ साठे (वय २८) आणि तिचा प्रियकर शुभम घाटुळे (वय २०) या दोघांना ताब्यात घेतले आहे. अनैतिक संबंधात अडथळा ठरत असल्याने पूर्वनियोजित कट रचून हा खून केल्याचे तपासात उघड झाले आहे.



बुधवार, १५ एप्रिल रोजी सकाळी तुळजापूर-अक्कलकोट मार्गावरील नटकल पुलाजवळ कृष्णाथ साठे यांचा मृतदेह आढळून आला होता.

अत्यंत क्रूरपणे हत्या झाल्याने जिल्ह्यात खळबळ उडाली होती. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तत्काळ तपास सुरू केला. प्राथमिक तपासात हा पूर्वनियोजित कट असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता.

तांत्रिक तपास आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी अवघ्या २४ तासांत आरोपींना ताब्यात घेतले. चौकशीत आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली असून, कृष्णाथ साठे यांच्या डोक्यात दगडाने जोरदार वार करून त्यांची हत्या केल्याचे उघड झाले.

त्यानंतर पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह फरफटत नेऊन नटकल पुलाजवळ टाकण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. या थंड डोक्याने आखलेल्या कटामुळे प्रकरणातील क्रौर्य समोर आले असून, या गुन्ह्यात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचाही पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक रितू खोखर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक नागदेव मुदे, पोलीस उपनिरीक्षक विजय घोटे, पोलीस हवालदार महादेव राऊत व जी.बी. वागुलकर यांच्या पथकाने ही कारवाई केली.

## काळभैरवनाथ यात्रेत सोन्याच्या चैनीवर चोरट्याचा डल्ला

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ एप्रिल -**

काळभैरवनाथ यात्रेदरम्यान गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने सोन्याची चैन लंपास केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी आंबी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.



याबाबत फिर्यादी आनंद अशोकराव पांडे (वय ४०, रा. धानोरा बु., ता. अंबाजोगाई, जि. बीड) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दि.१५ मार्च रोजी सोनारी येथील काळभैरवनाथ यात्रेत वाय चौक परिसरात गर्दीचा फायदा घेत अज्ञात व्यक्तीने त्यांच्या गळ्यातील अंदाजे १५ ग्रॅम वजनाची, सुमारे ८० हजार रुपये किंमतीची सोन्याची चैन चोरून नेली.

या प्रकरणी फिर्याद १५ एप्रिल रोजी दाखल करण्यात आली असून आंबी पोलीस ठाण्यात भा.न्या. सं. कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

## गावसुद परिसरात घरफोडी; २.१२ लाखांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ एप्रिल -**

गावसुद परिसरात अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून मोबाईल, रोख रक्कम व सोन्या-चांदीचे दागिने असा एकूण २ लाख १२ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना घडली आहे.

याबाबत फिर्यादी आदिनाथ हणुमंत तेरकर (वय २४, रा. गावसुद) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, १५ एप्रिल २०२६ रोजी पहाटे १.३० ते ३.५० वाजण्याच्या दरम्यान अज्ञात व्यक्तीने त्यांच्या तसेच जीवन डोलारे, वंदना चौरे व अनिल देशमुख (रा. बेडगा) यांच्या घरातून चोरी केली.

या प्रकरणी धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद केला आहे.

## तात्काळ कारवाई करून अतिक्रमण हटवले जाईल : नगराध्यक्ष गंगणे

**अतिक्रमण विरोधात सकल नाभिक समाज तुळजापूर यांच्या वतीने लाक्षणिक उपोषण...**



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१६ एप्रिल -**

शहरातील नियोजित सांस्कृतिक सभागृहाच्या जागेवरील अतिक्रमणाबाबत प्रशासनाने तात्काळ कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे. नगराध्यक्ष विनोद गंगणे यांनी स्पष्ट करत, समाजाची मागणी रास्त असून अतिक्रमण हटवण्यासाठी त्वरित पावले उचलली जातील, असे सांगितले.

नगरपालिकेकडून संबंधित अतिक्रमणधारकांना नोटिसा बजावण्यात आल्या असून येत्या दोन दिवसांत पोलीस संरक्षणात अतिक्रमण हटविण्याची कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. या प्रक्रियेसाठी अतिक्रमण विभागाने तयारी सुरू केली आहे. नगर पालिका प्रशासनाच्या या भूमिकेमुळे आंदोलनकर्त्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून नियोजित बांधकामासाठी मार्ग मोकळा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

उपोषणस्थळी नगराध्यक्ष विनोद गंगणे, नगरसेवक औदुंबर कदम, उपनगराध्यक्ष रामचंद्र रोचकरी, विशाल रोचकरी, किशोर साठे, रत्नदीप भोसले, दिनेश क्षीरसागर, पंडितराव जगदाळे, अमर हंगरगेकर, सागर कदम, अनंत सावंत, नरेश अमृतराव, आनंद कंदले, राजेश्वर कदम, श्री गवळी आदींसह नगरपालिका अतिक्रमण विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

### सलून दुकाने बंद ठेवत निषेध...

वेताळ नगर भागात प्रस्तावित श्री संत सेना महाराज सांस्कृतिक सभागृहाच्या जागेवर वाढलेल्या अतिक्रमणाच्या विरोधात सकल नाभिक समाज तुळजापूर यांच्या वतीने लाक्षणिक उपोषण करण्यात आले. या मागणीसंदर्भात नगरपालिका व संबंधित प्रशासनाला वेळोवेळी निवेदन सादर करूनही ठोस कारवाई होत नसल्याने समाजबांधवांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला. या लाक्षणिक उपोषणास शहरातील सर्व नाभिक बांधवांनी प्रतिसाद देत एक दिवस सलून दुकाने बंद ठेवून निषेध व्यक्त केला.

## बुधवारी बहुजन योद्धा संघटनेतर्फे डॉ. आंबेडकर जयंती मिरवणूक



**मनोज जरांगे-पाटील उपस्थितीत राहणार...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ एप्रिल -**

बहुजन योद्धा सामाजिक संघटनेच्या बोधिसत्व, विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या वतीने २२ एप्रिल रोजी सायंकाळी धाराशिव शहरात भव्यदिव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. यंदाच्या मिरवणुकीचे उद्घाटन मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा मार्गदर्शक धनंजय (नाना) शिंगाडे यांनी दिली.

शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष प्रवीण सूर्यवंशी, कार्याध्यक्ष सुधीर पवार, बलराज रणदिवे, मसूद शेख, खालील सय्यद, अजहर मुजावर, आयाज शेख, सतीश कदम, रोहित पडवळ, लक्ष्मण माने, पांडू भोसले, अभिजित सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

शिंगाडे यांनी सांगितले की, गेल्या ३२ वर्षांपासून संघटनेमार्फत धाराशिवमध्ये विविध समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून जयंती उत्सव साजरा केला जात आहे. महापुरुषांचे विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य सातत्याने सुरू आहे. मिरवणुकीत महिला, पुरुष आणि युवक मोठ्या संख्येने सहभागी होत असून सर्व जाती-धर्मातील नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग असतो.

दरवर्षीप्रमाणे यंदाही पारंपारिक वाद्यांच्या गजरात मिरवणूक काढण्यात येणार असून विविध राज्यांतील वाद्य पथकांना आमंत्रित करण्यात आले आहे. तसेच रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी, रुग्णांना फळवाटप, वृक्षलागवड यांसारखे समाजोपयोगी उपक्रमही राबविण्यात येणार आहेत.

सध्या जागतिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शांततेचा संदेश देणाऱ्या गौतम बुद्ध यांचा देखावा मिरवणुकीचे विशेष आकर्षण ठरणार आहे. तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात येणार आहे. २२ एप्रिल रोजी दुपारी १ वाजता जिजाऊ चौक येथून मोटारसायकल रॅली काढण्यात येणार आहे. सायंकाळी क्रांती चौक, भीमनगर येथून मिरवणुकीला प्रारंभ होऊन शहरातील प्रमुख मार्गांवरून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे सांगता होणार आहे.

या भव्य मिरवणुकीत सर्व जाती-धर्मातील आंबेडकरी विचारांच्या नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन धनंजय शिंगाडे यांनी केले.

## पाडोळी (आ)-टाकळी रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी

**व्यंकट गुंड यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ एप्रिल -**

परळी ते अक्कलकोट राज्य मार्गावरील पाडोळी (आ) ते टाकळी या रस्त्याची अत्यंत खराब झालेली अवस्था लक्षात घेऊन तात्काळ दुरुस्ती व मजबुतीकरण करण्याची मागणी भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य ॲड. व्यंकट गुंड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम मंत्री छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनाही निवेदन देण्यात आले आहे.



निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, धाराशिव तालुक्यातील हा महत्त्वाचा दळणवळणाचा मार्ग मागील दोन वर्षांपासून अत्यंत खराब अवस्थेत असून रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे वाहन चालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. एसटी बस सेवा बंद झाल्याने नागरिक, विद्यार्थी व शेतकऱ्यांची मोठी गैरसोय होत आहे.

विशेषतः विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत असून, ऊस वाहतुकीमुळे रस्त्याची दुरवस्था अधिक वाढली आहे. पावसाळ्यात चिखलामुळे प्रवास धोकादायक बनत असून अपघातांचे प्रमाणही वाढले आहे.

पावसाळ्यापूर्वी रस्त्याची तात्काळ पाहणी करून दुरुस्ती व मजबुतीकरण करावे, तसेच शाळा सुरू होण्यापूर्वी रस्ता सुस्थितीत करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

## तुळजापूरात ‘नगर परिषद आपल्या दारी’ उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१६ एप्रिल -**

नागरिकांना विविध नागरी सुविधा सुलभपणे उपलब्ध करून देण्यासाठी तुळजापूर नगर परिषदेतर्फे ‘नगर परिषद आपल्या दारी’ हा उपक्रम प्रभागनिहाय राबविण्यात येणार असल्याची माहिती नगराध्यक्ष विनोद गंगणे यांनी दिली.

आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या सूचनेनुसार शहरातील नागरी समस्या सोडविणे, विकासकामांना गती देणे तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. प्रत्येक प्रभागातील समस्या जाणून घेऊन त्यावर उपाययोजना करण्यासाठी समित्या गठीत करण्यात येणार आहेत.

प्रभाग क्रमांक १ ते ४ साठी १६ एप्रिल २०२६, प्रभाग ५ ते ८ साठी १७ एप्रिल आणि प्रभाग ९ ते ११ साठी पुढील बैठका तुळजापूर येथील द स्काय लॅण्ड हॉटेल येथे आयोजित करण्यात आल्या आहेत. नागरिकांनी बैठकीस उपस्थित राहून आपल्या समस्या व सूचना मांडाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

या उपक्रमांतर्गत स्वच्छता, पाणीपुरवठा, पथदिवे, अतिक्रमण, मंदिर विकास आराखडा, आरोग्य, शिक्षण, क्रीडा, घनकचरा व्यवस्थापन, सोलर प्रकल्प, वाहनतळ, उद्योजकता विकास आदी विविध क्षेत्रांसाठी एकूण ३९ समित्या गठीत केल्या जाणार आहेत.

नगराध्यक्ष विनोद गंगणे, उपनगराध्यक्ष रामचंद्र रोचकरी व गटनेते औदुंबर कदम यांनी नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवून शहराच्या विकासात योगदान देण्याचे आवाहन केले आहे.

## मानधनाचा वेळेवर पत्ता नाही; रोजगार सेवक संतप्त

**ग्रामरोजगार सेवकांचे आठ हजार हवेतच घोषणा!**

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१६ एप्रिल -**

ग्रामरोजगार सेवकांना दरमहा ८ हजार रुपये मानधन देण्याचा तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेला निर्णय अद्याप प्रत्यक्षात लागू न झाल्याने सेवकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. शासन निर्णय होऊन वर्ष उलटले तरी एक रुपयाही खात्यावर जमा न झाल्याने भूम तालुक्यातील ग्रामरोजगार सेवक संतप्त झाले असून मोठ्या आंदोलनाच्या तयारीत आहेत.

महायुती सरकारमधील या निर्णयाकडे विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारकडून होत असलेले दुर्लक्ष संतापजनक असल्याची भावना व्यक्त होत आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत ग्रामीण भागातील मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी २६ जानेवारी २००८ रोजी ग्रामरोजगार सेवकांची नियुक्ती करण्यात आली होती.




अल्पभूधारक व मागासवर्गीय शेतकऱ्यांसाठी विहीर, फळबाग, शौचालय, गांडूळ खत प्रकल्प, रेशीम उद्योग, घरकुल यांसारख्या विविध योजनांची अंमलबजावणी हीच यंत्रणा करते.

३ ऑक्टोबर २०२४ रोजी ८ हजार रुपये मानधनाचा शासन निर्णय जाहीर झाला; मात्र आजतागायत त्याची अंमलबजावणी झालेली नाही.

यासंदर्भात राज्यभर संघटनेने १ एप्रिलपासून बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केले असून भूम तालुक्यातील ९६ ग्राम रोजगार सहाय्यक त्यात सहभागी झाले आहेत. जोपर्यंत शासन निर्णयाची अंमलबजावणी होत नाही, तोपर्यंत आंदोलन सुरूच राहील, असा इशारा देण्यात आला आहे.

दरम्यान, गावपातळीवर सर्व जबाबदारी पार पाडणाऱ्या ग्रामरोजगार सेवकांना तुटपुंज्या मानधनावर काम करावे लागत आहे.

मिळणारे अल्प मानधनही कामाशी संबंधित खर्चात संपत असल्याने घरखर्च भागवणे कठीण झाले आहे. तब्बल १७ वर्षे सेवा करूनही ना स्थैर्य, ना शासकीय दर्जा, ना कोणत्याही सुविधा-अशी त्यांची अवस्था आहे.

> शासनाने हजेरी पत्रक ऑनलाईन करण्याची सुविधा दिली असली तरी प्रिंटरची सुविधा नसल्याने छपाईचा खर्च स्वतःच्या खिशातून करावा लागतो. योजनांची अंमलबजावणी करताना स्वतःलाच आर्थिक फटका बसत आहे, ही अत्यंत अन्यायकारक परिस्थिती आहे.
> **- बाबासाहेब कुंभार (रोजगार सेवक संघटना, तालुका अध्यक्ष)**

विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दरमहा ८ हजार रुपये मानधन व अतिरिक्त कामासाठी भत्ता देण्याची घोषणा केली होती.

शासन निर्णय निघूनही अंमलबजावणी न झाल्याने हा निर्णय फक्त घोषणांपुरता होता का? असा सवाल सेवकांकडून उपस्थित केला जात आहे.

योजनेच्या अंमलबजावणीत अपुऱ्या यंत्रणेमुळे अपेक्षित यश मिळत नसल्याचीही टीका होत आहे. शासनाने वेळेत निर्णय न घेतल्यास राज्यभर तीव्र आंदोलन उभे राहण्याची चिन्हे दिसत आहेत.